पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय
**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१०)**

दिनांक : ०७/०२/२०२० वेळ: सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०२० ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०७/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.बुर्डे सुवर्णा विकास | - | **अध्यक्षा** |
| २) मा. श्री.नितीन (आप्पा)प्रताप काळजे | - | सदस्य |
| ३) मा.डोळस विकास हरिचंद्र- | - | सदस्य |
| ४) मा. उंडे लक्ष्मण धोंडु | - | सदस्य |
| ५) मा. घुले नानी उर्फहिराबाई गोवर्धन | - | सदस्या |
| ६) मा.गोफणे अनुराधा देविदास | - | सदस्या |
| ७) मा.बारसे प्रियांका प्रविण | - | सदस्या |
| ८) मा.अजित दामोदर गव्हाणे | - | सदस्य |
| ९) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे | - | सदस्य |
| १०) मा.फुगे भिमाबाई पोपट | - | सदस्या |
| ११) मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | - | सदस्य |
| १२) मा.लांडे विजय नामदेव | - | स्विकृत सदस्य |
| १३) मा. साधना सचिन तापकीर | - | स्विकृत सदस्या |
| १४) मा.बुर्डे अजित प्रताप | - | स्विकृत सदस्य |

या शिवाय मा.श्रीनिवास रामचंद्र दांगट - क्षेत्रीय अधिकारी,मा.प्रविण लडकत-कार्यकारी अभियंता,(पा.पु) , मा.श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.राजेंद्र शिंदे-उपअभियंता स्थापत्य, श्री.विजय जाधव-उपअभियंता स्थापत्य/उद्यान, श्री.वहीकर एस.एस. उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, श्रीमती प्रेरणा शिनकर, उपअभियंता, स्थापत्य, श्री.वि.की.वाईकर,उपअभियंता,जलनिसारण विभाग,श्री.संदेश खडतरे – उपअभियंता-नगररचना, श्री.राजेश नंदलाल भाट –

सहा.आरोग्याधिकारी, श्री.एस.व्ही.बगाडे-सहाय्यक उद्यान अधिक्षक, श्री.व्ही.एम.ताकवले -क.अभियंता (स्थापत्य.), श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), गणबोटे ए.पी. क.अभियंता (स्थापत्य),मनोज मरगडे (नागरवस्ती),श्री.संदीप ठोकळे क.अभियंता (ज.नि),श्री.कोंढरे सुरेश-प्रशासन अधिकारी (अतिक्रमण),श्री.फाटक डी.डी. क.अभियंता (पा.पु) – श्री.विनय जगताप –स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (पा.पु.),श्री.साळुंखे जे.जी. मुख्याध्यापक,माध्यविद्यालय, भोसरी श्री.सावंत विद्यानंद लक्ष्मण सह. शिक्षक ,इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

, सौ.सुवर्णा बुर्डे, सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.

तदनंतर मा.सभापती सौ.सुवर्णा बुर्डे यांनी मागील कार्यपत्रिका क्रमांक ०९ दिनांक ०३/०१/२०२० रोजीचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे जाहिर केले.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-१ | मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्र.०३ मोशी-च-होली सन २०२०-२१ अंदाजपत्रकात नविन कामांची नावे समाविष्ट करणे |
| विषयक्रमांक-२ | मा. प्रशासन अधिकारी यांचा इ क्षेत्रिय कार्यालयाचा सन २०१९-२०चा सुधारीत व सन २०२०-२१ चा मुळ अंदाजपत्रकास मंजुरीबाबत प्रस्ताव |
| विषय क्रमांक-३ | मा. श्री.नितीन (आप्पा) प्रताप काळजे यांचा प्रस्ताव<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे – च-होली ता.हवेली येथील स.नं.५११(जुना ९८१) येथील १८ मी.. रस्त्यावरील चौकास"बबन बाबुराव सोनवणे चौक "असे नामकरण करणेबाबत . |
| विषय क्रमांक-४ | मा. श्री.नितीन (आप्पा)प्रताप काळजे यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्र.०३ मध्ये जो पर्यंत पाणी पुरवठा सुरळीत होत नाही तो पर्यंत सोसायटया व बांधकाम यांना ना हरकत दाखला देणेत येऊ नये |

बाबतचा प्रस्ताव

विषय क्रमांक ५- मा.सौ.हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचा प्रस्ताव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीतील प्रभाग क्र.०४ दिघी बोपखेल येथील प्रभागातील गणेशनगर गल्ली क्र.१४ या रस्त्याला "बाळकृष्ण तात्याबा भालेराव गुरुजी" असे नामकरण करणेबाबत

विषय क्रमांक ६- मा.भिमाबाई पोपट फुगे यांचा प्रस्ताव
भोसरी गावठाण प्रभाग क्र.०७ परीसरात नविन विद्युत पोल बसविणे बाबत

ठराव क्र. :- ४०　　　　　विषय क्र. :- ०१

दिनांक :- ०७/०२/२०२०

सुचक :- श्री.नितीन (आप्पा)प्रताप काळजे　　　अनुमोदक :- अजित दामोदर गव्हाणे

संदर्भ :- मा. क्षेत्रिय अधिकारी यांचेकडिल पत्र क्र, श्रीभैवा/०७/कावि/१२/२०२० दि. २२/०१/२०२० ...मा. क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय, चिंचवड यानां महाराष्ट्र शासनाचा "ब" दर्जा प्राप्त असुन त्यांना अनुदान प्राप्त होत आहे. तसेच सार्वजनिक वाचनालय विभागाच्या उपविधी " महाराष्ट्र शासन राजपत्र" नुसार वाचनालयाकरीता ग्रंथ/पुस्तके खरेदी करणेकामी त्रिसदस्य समिती स्थापन करण्यात आलेली असून सदर समितीमध्ये मा. शाखा प्रमुख, मा. शिक्षणाधिकारी, व मा. आयुक्तसो यांनी सुचविलेली ग्रंथालयशास्त्राशी निगडीत अशी व्यक्ती यांच्या शिफारशीनुसार पुस्तके खरेदी करण्यात यावे असे नमुद करण्यात आल्याने मा. शिक्षणाधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडिल दिनांक ०५/१२/२०१९ च्या मान्य प्रस्तावान्वये ३२० पुस्तक/ग्रंथ साहित्य खरेदी करण्यास हरकत वाटत नाही असा अभिप्राय देण्यात आलेला आहे. त्यानुसार कोटेशन नोटीस क्र. १ जा.क्र.भैसावा/कावि/४२/२०१९, दि.२७/१२/२०१९ अन्वये अटी व शर्तीसह प्रसिध्द करून ३२० पुस्तक/ग्रंथ साहित्य खरेदीकामी दरपत्रक मागविण्यात आले असता करण बुक सर्व्हिस, नारायण पेठ, लोखंडे तालीम गणपती मंदिराजवळ, पुणे, कुणाल एजन्सी, नारायण पेठ, लोखंडे तालीम गणपती मंदिराजवळ, पुणे

शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे, या ३ पुरवठा धारकांकडुन कोटेशन प्राप्त झाले आहे .

"इ" क्षेत्रीय कार्यालया मार्फत सार्वजनिक वाचनालयाकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता " पुस्तके व नियतकालिके खरेदी " या लेखाशिर्षावर र.रू. ८६,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली असून संभाव्य ६ महिन्याच्या तरतुदीमध्ये १,५०,०००/- इतकी वाढीव तरतुद करण्यात आलेली आहे. सदर लेखाशिर्षातून श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालयाकरीता ग्रंथ,(शासन मान्य पुस्तकांसह) वृत्तपत्रे व नियतकालिके, पुस्तके/ग्रंथ खरेदी करण्यात येतात.

शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे, यांनी, सदर ३२० पुस्तके/ग्रंथ साहित्याचा पुरवठा करणेकामी, सर्वात जादा २१% सुटीचे दरपत्रक सादर केलेले आहे. त्यानुसार शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे, यांचेकडुन अटी व शर्ती नुसार श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालयाकरिता ३२० पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी २१% सुट दिल्याने त्यांचे दरपत्रक स्विकारण्यात आलेले आहे. सदरचा खर्च " पुस्तके व नियतकालिके खरेदी " या लेखाशिर्षातून अदा करण्यास येणार आहे.तरी शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे, यांचेकडून प्राप्त झालेल्या दराप्रमाणे श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी करीता ३२० पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी अंदाजे र.रू. ७०,०००/- च्या किमतीवर येणा-या एकूण किमतीवर २१% सुट देऊन पुस्तके खरेदीकामी येणा-या खर्चाकामीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

ठराव क्रमांक : ४१ विषय क्रमांक : ०१
दिनांक : ०७/०२/२०२०
सुचक : मा.श्री.नितीन (आप्पा) प्रताप काळजे अनुमोदक : मा नितीन ज्ञानेश्वर लांडगे

संदर्भ मा. बुर्डे सुवर्णा विकास यांचे दिनांक ०७/०२/२०२० रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे मौजे – च-होली या परीसरातील स्थापत्य विषयक कामे सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ करणे बाबत १) मौजे च-होली येथील बुर्डेवस्ती रस्त्यावरील बुध्द विहार

इमारतीसाठी सिमा भिंतबांधणेकामी अंदाजपत्रकात र.रु २५लाख तरतुद करणे २) मौजे च-होली गावठाणातील दवाखान्याची स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेस र.रु २५लाख तरतुद करणेस येणा-या खर्चाकामीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

ठराव क्रमांक : ४२ विषय क्रमांक : ०२

दिनांक : ०७/०२/२०२०

सुचक : मा. संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे अनुमोदक : मा. अजित दामोदर गव्हाणे

संदर्भ क्र, इक्षेका/०६/कावि/१३/२०२० दि. ०६/०२/२०२०चे लेखा विभागा कडील पत्र

इ क्षेत्रिय कार्यालयाचे सन २०१९-२०चा सुधारीत व सन २०२०-२१ चा मुळ अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असुन सदर अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (maharastra municipal corporation act ) चे कलम २९(अ) मधील कलम (७) चे पोटकलम (ब) नुसार मा. प्रभाग समिती ची मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

ठराव क्रमांक : ४३ विषय क्रमांक : ०३

दिनांक : ०३/०१/२०२०

सुचक : मा श्री.नितीन (आप्पा) प्रताप काळजे अनुमोदक : मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

संदर्भ मा. . श्री.नितीन (आप्पा) प्रताप काळजे यांचे दिनांक ०७/०२/२०२० रोजीचे पत्र मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे – च-होली येथील स.नं. ५११ (जुना ९८१) येथील १८ मी रस्त्यावरील चौकास"बबन बाबुराव सोनवणे चौक "असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ४४ | विषय क्रमांक : | ०४ |
| दिनांक | : | ०७/०२/२०२० | | |
| सुचक | : | मा श्री.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | अनुमोदक : | मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे |

संदर्भ मा. श्री.नितीन (आप्पा) प्रताप काळजे यांचे दिनांक ०७/०२/२०२० रोजीचे पत्र मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे – च-होली-मोशी प्रभागामध्ये पाणी पुरवठा अत्यंत विस्कळीत झाला असुन नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाही. नागरिकांच्या मोठया प्रमाणावर तक्रारी असून पाणी पुरवठा सुरळीत होत नाही तो पर्यंत प्रभाग क्र.०३ मधील सोसायटया,मोठे प्रकल्प यांना(ना हरकत दाखले)NOC देण्यात येऊन नयेत या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ४५ | विषय क्रमांक : | ०५ |
| दिनांक | : | ०७/०२/२०२० | | |
| सुचक | : | मा . श्री.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | अनुमोदक : | मा. उंडे लक्ष्मण धोंडु |

संदर्भ मा. . .सौ.हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचे दिनांक ०७/०२/२०२० रोजीचे पत्र मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.०४ दिघी -बोपखेल या प्रभागातील गणेशनगर गल्ली क्र.१४ या रस्त्याला "बाळकृष्ण तात्याबा भालेराव गुरुजी" नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

ठराव क्रमांक : ४६ विषय क्रमांक : ०६
दिनांक : ०७/०२/२०२०
सुचक : मा सौ.हिराबाई (नानी) गोवर्धन घुले अनुमोदक : मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

संदर्भ- मा. . भिमाबाई पोपट फुगे यांचे दिनांक ०७/०२/२०२० रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.०७ भोसरी गावठाण येथील परिसरात नविन विद्युत पोल बसविणे बाबतची नागरीकांकडुन मागणी होत असलेने नविन विद्युत पोल बसविणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.
यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करुन मा.अध्यक्षा,यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(सुवर्णा बुर्डे)
अध्यक्षा, इ प्रभाग समिती

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ ०४/कावि/ ६७ /२०२०
दिनांक २७/०२ /२०२०

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२-/सभावृत्तांतातील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.